**अपंग व्यक्तींना अपंग व्यक्ती (समान संधी संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम-१९९५ च्या अनुषंगाने केंद्र शासनाने अपंगांच्या पदनिश्चितीबाबत प्रसिध्द केलेल्या यादीनुसार महिला व बाल विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील गट अ ते ड मधील पदांवर शारीरिकदृष्टया अपंग व्यक्तींसाठी सुयोग्य पदे निश्चित करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन आदेश क्र. मबाआ-२०१०/ प्र.क्र. १२५ / का-७
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक :- १४ जानेवारी, २०११.

संदर्भ :- १) अपंग व्यक्ती (समान संधी संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम-१९९५.

२) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.१२/ १६-अ, दि.२.५.१९९८.

३) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.अपंग-१००१/६१/प्र.क्र.३६/२००२/ १६-अ, दि.१०.५.२००२.

४) शासन निर्णय :- सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९९/प्र.क्र. ३७/९९/ १६-अ, दि.५.३.२००३.

५) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र. मबाअ-२००३/प्र.क्र. २३९/ का-७, दि.३०.८.२००५.

६) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग अपंग -२००९/प्र.क्र.२७६/०९/१६-अ, दि.१९.३.२०१०.

७) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. न्यायाप्र-२००९/ प्र.क्र.५/सुधार-३/ दि.३.८.२०१०.

**<u>प्रस्तावना</u>** :- अपंग व्यक्तींना, अपंग व्यक्ती (समान संधी संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम-१९९५ (१९९६ चा क्र.१) हा अधिनियम दि.६.२.१९९६ पासुन लागू केला आहे. या अधिनियमान्वये अपंगांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी शासन सेवेतील गट-अ ते गट-ड मधील सरळसेवा भरतीच्या पदांना ३% आरक्षण लागू करण्याची

तरतूद सामान्य प्रशासन विभागाने दि.२.५.१९९८ च्या परिपत्रकान्वये केलेली आहे. अपंग व्यक्ती ((समान संधी संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम-१९९५ मधील कलम ३२ व ३३ नुसार शासन निर्णय महिला व बाल विकास दि.३०.८.२००५ अन्वये महिला व बाल विकास विभागांतर्गत गट-अ ते ड संवर्गातील सरळसेवा भरतीने नियुक्तीसाठी सुधारित अपंग आरक्षण लागू करण्यात आले आहे.

आता अपंग व्यक्तींसाठी सुधारित पदनिश्चिती करण्यासंदर्भात दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.२२५/ २००९ मध्ये मा.न्यायालयाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अपंगांसाठी शासकीय /निमशासकीय सेवेतील आरक्षित पदे सुनिश्चित करण्याचे निदेश दिलेले आहेत. त्यास अनुलक्षून केंद्र शासनाने अपंग व्यक्ती अधिनियम-१९९५ मधील तरतूदीस अनुलक्षून त्यांच्या अखत्यारितील आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी पदे निश्चित करुन त्याची यादी प्रसिध्द केलेली आहे. सदर यादीनुसार राज्यशासनाच्या अखत्यारितील शासकीय / निमशासकीय आस्थापनेवरील जी पदे समान आहेत ती पदे अपंगांसाठी निश्चित करुन तसे आदेश निर्गमित करावे अशा सूचना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दि.३.८.२०१० च्या शासन निर्णयान्वये दिल्या आहेत. त्यानुसार महिला व बाल विकास आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सरळसेवेने भरण्यात येणाऱ्या गट-अ ते ड मधील पदे अपंगांसाठी सुनिश्चिती करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :- मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. २२५/ २००९ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार महिला व बाल विकास आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील गट- अ ते ड मधील अपंग व्यक्तिंसाठी पदे आरक्षित करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या दि.३०.८.२००५ चा शासन आदेश अधिक्रमित करण्यात येत आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.३.८.२०१० च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनेनुसार महिला व बाल विकास आयुक्तालयाच्या गट-अ ते ड मधील सरळसेवा भरतीने भरावयाच्या पदांसाठी (केंद्र शासनाच्या यादीतील समान पदे विचारात घेवून) सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मधील तक्त्यात दर्शविलेल्या अपंगांसाठी पदे सुनिश्चित करण्यात येत आहेत.

२. अपंगांसाठी विहित केलेले ३% आरक्षण खालील अटीच्या अधीन राहील.

(१) अपंगांचे आरक्षण फक्त सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय राहील.

(२) एकाकी पदास अपंगांचे आरक्षण लागू होणार नाही.

(३) सरळसेवेतील भरतीमध्ये अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असावे व अपंग प्रवर्गासाठी प्रत्येकी १ याप्रमाणे ३% आरक्षण लागू राहील.

(४) अपंग व्यक्तीसाठी आरक्षित असलेल्या पदावर सरळसेवा नियुक्तीपूर्वी संबंधित उमेदवाराने शारीरिक पात्रतेसंदर्भात संबंधित विषयाच्या तज्ञांचा समावेश असलेल्या वैद्यकिय मंडळाने प्रमाणित केलेले, प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(५) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. अपंग-१००९/प्र.क्र. २७६/ ९/ १६-अ, दि.१९.३.२०१० मधील तरतूदीनुसार गट-अ ते ड मधील अपंगाची आरक्षित पदे सरळसेवेने भरताना ती सामाजिक प्रवर्गात न दर्शविता स्वतंत्रपणे दर्शविण्यात येवून निवड झाल्यास अपंग उमेदवारांना ते ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्या प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घेण्यात येईल.

(६) तसेच गट क व ड मध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या दि.५.३.२००२ च्या शासन निर्णयाप्रमाणे पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू राहील.

महिला व बाल विकास आयुक्तालयातील खालील पदे पदोन्नतीने भरण्यात येत असल्यामुळे त्यांना अपंगांचे आरक्षण लागू राहणार नाही.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | अपंगांचे आरक्षण लागू न राहण्याचे कारण |
|---|---|---|---|
| | | **गट-अ ची पदे** | |
| १. | सह आयुक्त | १५६००-३९१०० (ग्रेड पे-७६००) | १००% पदोन्नती. |
| २. | उप आयुक्त | १५६००-३९१०० (ग्रेड पे-६६००) | १००% पदोन्नती. |
| ३. | विशेष कार्य अधिकारी | १५६००-३९१०० (ग्रेड पे-६६००) | १००% पदोन्नती. |
| | | **गट-क ची पदे** | |
| ४. | कार्यालयीन अधिक्षक | ९३००-३४८०० (ग्रेड पे-४३००) | १००% पदोन्नती. |
| ५. | सहाय्यक | ९३००-३४८०० (ग्रेड पे-४३००) | १००% पदोन्नती. |
| ६. | निरिक्षक प्रमाणित शाळा व संस्था (कनिष्ठ) | ९३००-३४८०० (ग्रेड पे-४३००) | १००% पदोन्नती. |
| ७. | जिल्हा परिविक्षा अधिकारी | ९३००-३४८०० (ग्रेड पे-४५००) | १००% पदोन्नती. |
| ८. | अधिक्षक, संस्था | ९३००-३४८०० (ग्रेड पे-४४००) | १००% पदोन्नती. |
| ९. | उप अधिक्षक | ९३००-३४८०० (ग्रेड पे-४४००) | १००% पदोन्नती. |
| १०. | प्रमुख लिपीक | ९३००-३४८०० (ग्रेड पे- | १००% पदोन्नती. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ४२००) | |
| ११. | वरिष्ठ लिपिक (सहायक) | ५२००-२०२०० (ग्रेड पे-२४००) | १००% पदोन्नती. |
| | **गट-ड ची पदे** | | |
| १२. | नाईक | ४४४०-७४४० (ग्रेड पे-१६००) | १००% पदोन्नती |
| १३. | जमादार | ४४४०-७४४० (ग्रेड पे-१६००) | १००% पदोन्नती |
| १४. | दप्तरी | ४४४०-७४४० (ग्रेड पे-१६००) | १००% पदोन्नती |

महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत खालील पदांची नियुक्ती विभागातून होत नसल्यामुळे त्यांना अपंगांचे आरक्षण विहित करण्यात आलेले नाही.

| क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | आरक्षणातून वगळण्याची कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | आयुक्त | संवर्ग पद | भारतीय प्रशासन सेवेतील पद आहे. |
| २. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | १५६००-३९१०० (ग्रेड पे-६६००) | प्रतिनियुक्तीने भरण्यात येते. |
| | **गट-ब ची पदे** | | |
| ३. | वैद्यकिय अधिकारी | ९३००-३४८०० (ग्रेड पे-४४००) | प्रतिनियुक्तीने भरण्यात येते. |
| ४. | उप अभियंता | ९३००-३४८०० (ग्रेड पे-४४००) | प्रतिनियुक्तीने भरण्यात येते |
| ५. | लेखा अधिकारी | ९३००-३४८०० (ग्रेड पे-४४००) | प्रतिनियुक्तीने भरण्यात येते. |
| | **गट-क ची पदे** | | |
| ६ | सहाय्यक लेखा अधिकारी | ९३००-३४८०० (ग्रेड पे-४३००) | प्रतिनियुक्तीने भरण्यात येते. |
| ७. | परिचारिका (प्रशिक्षित) | ९३००-३४८०० (ग्रेड पे-४२००) | प्रतिनियुक्तीने भरण्यात येते. |
| ८. | परिचारिका | ९३००-३४८०० (ग्रेड पे-४२००) | प्रतिनियुक्तीने भरण्यात येते. |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला आहे. त्यांचा संगणक सांकेतांक क्र. 201101151536155001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(ज. कि. मगरे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

उप सचिव, महिला व बाल विकास मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मा.मंत्री (महिला व बाल विकास ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग. (पत्राने)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
सामाजिक न्याय विभाग, (सुधार-३) मंत्रालय, मुंबई.
सामान्य प्रशासन विभाग (का-१२) (१६-ब), मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, का-७.

# परिशिष्ठ - अ

**अपंग व्यक्तीसाठी सुयोग्य पदांची निश्चिती**
**प्रशासकीय विभागाचे नाव : महिला व बाल विकास विभाग , मंत्रालय, मुंबई-३२.**
**कार्यालयाचे नाव - महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व अधिनस्त कार्यालय.**

| अ.क्र. | पदनाम | शारीरिक योग्यता | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाचा संवर्ग | पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|
| १ | अधिव्याख्याता (गट-ब) | | | |
| २ | वरिष्ठ लघुलेखक (गट-ब) | S, ST, W, L, MF, RW,H,C | OA, OL, BL,OAL, B, LV | श्रुतलेखन घेणे व टंकलिखित करणे. स्वीय सहायक म्हणून काम करणे. |
| ३ | निम्नश्रेणी लघुलेखक | S, ST, W, L, MF, SE,RW,H,C | OA, OL, BL,OAL, B, LV, HH | श्रुतलेखन घेणे व टंकलिखित करणे. |
| ४ | ग्रंथपाल | S,BH, MF, SE, RW, C | OA, OL, OAL, BL, HH | ग्रंथपालाची कामे. |
| ५ | शिक्षक | -- | OA, OL,B, LV, HH | संस्थेमधील मुलांना शिक्षण देणे. |
| ६ | वरिष्ठ लिपिक | S, ST, W, MF, SE,RW,C | OA, OL,BL,OAL, B, LV, HH | रोखपाल म्हणून काम पहावे लागते. देयके तयार करणेख कोषागारात टाकणे, खर्चमेळ, लेखा तपासणीसारखी कामे करावी लागतात. |
| ७ | सांख्यिकी सहायक | S, ST, W, BN, MF, SE, RW, | ON, VL, V, LV, HH | रोखपाल म्हणून काम पहावे लागते. देयके तयार करणेख कोषागारात टाकणे, खर्चमेळ, लेखा तपासणीसारखी कामे करावी लागतात. |
| ८ | कृषि सहायक | ST, W,L, BN, MF | OL, BL, LV, HH | आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील शासकीय जमीनीची पाहणी करणे, शेतीविषयक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिने नवीन प्रयत्न करणे. |
| ९ | निदेशक | S, ST,W, BL,L,SE, RW, H,C | OL, BL, HH | संस्थेमध्ये दाखल होणाऱ्या अनाथ, निराधार, निराश्रित मुलांना त्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टिने वेगवेगळया प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. सदर प्रशिक्षण देताना वेगवेगळी यंत्रसामुग्री हाताळावी लागते. |
| १० | शिवण निदेशक | S, ST,W, BL,L,SE, RW, H,C | OL, BL, HH | संस्थेमध्ये प्रवेशितांना प्रशिक्षण देताना शिलाइमशीनवर काम करावे लागते. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | सुतार निदेशक | S, ST,W, BL,L,SE, RW, H,C | OL, BL, HH | संस्थेमधील प्रवेशितांना प्रशिक्षण देताना सुतारकामाची हत्यारे व मशीनवर काम करावे लागते. |
| १२ | टर्नर | ST, MF, SE | OL, LV, HH | संस्थेमधील प्रवेशितांना प्रशिक्षण देताना वेगवेगळी मशीन व कामासाठीची हत्यारे वापरुन प्रशिक्षण दयावे लागते. |
| १३ | फिटर | ST,BN,L, MF | OL,B L, LV, HH | संस्थेमधील प्रवेशितांना प्रशिक्षण देताना वेगवेगळी मशीन व कामासाठीची हत्यारे वापरुन प्रशिक्षण दयावे लागते. |
| १४ | रेडियो | S, ST, BH,W, L, MF, SE | OL, BL, LV HH | संस्थेमधील प्रवेशितांना प्रशिक्षण देताना इलेक्ट्रॉनिक वायरींग , मशीन व कामासाठीची हत्यारे वापरुन प्रशिक्षण दयावे लागते. |
| १५ | वायरमन | S, ST, W, L, MF, | OL, HH | संस्थेमधील प्रवेशितांना प्रशिक्षण देताना इलेक्ट्रॉनिक वायरींग , मशीन व कामासाठीची हत्यारे वापरुन प्रशिक्षण दयावे लागते. |
| १६ | चित्रकला शिक्षक | S, ST, W, BN, L, SV, RW, H,C | O, A, OL, OAL, BL, HH | संस्थेमधील प्रवेशितांना चित्रकलेचे शिक्ष ण देण्यात येते. |
| १७ | यांत्रिकी | ST, MF, SE | OL, LV, HH | संस्थेमधील प्रवेशितांना प्रशिक्षण देताना इलेक्ट्रिक यंत्राशी मशीनवर काम करणे. |
| १८ | कनिष्ठ लिपिक/ लेखा लिपिक | S, ST, W, MF, SE,RW,C | OA, OL,BL,OAL, B, LV, HH | लिपिक स्वरुपाचे सर्व कामकाज करणे. |
| १९ | ट्रॅक्टर चालक | S, ST, BN, WC, SE | OL, HH | वाहन चालविणे. |
| २० | बँड मास्तर | S, MF, H,C, | OL,BL, B, LV | प्रवेशितांना संगीत शिकविण्याचे काम केले जाते. |
| २१ | शिपाई | S, ST, W, PP, L, KC, SE, RW, C, MF | OA, OL HH, B, LV | कार्यालयातील कागदपत्रे ने-आण करणे इ. कामे केली जातात. |
| २२ | सफाईगार | S, ST, W, PP, L, KC, SE, N | OA, OL, HH, LV | शासकीय संस्थांची व संस्थेमध्ये दाखल झालेल्या प्रवेशितांची स्वच्छता राखणे. |
| २३ | स्वयंपाकी | S, ST, W, F, PP, L, B, | BL, OL, B, LV | बालगृह व शासकीय संस्थेतील मुलांसाठी जेवण तयार करणे. |
| २४ | स्त्री परिचारिका (आया) | S, ST, W, F, PP, L, KC, B, | OL, HH, B, LV | शासकीय संस्थांची व संस्थेमध्ये दाखल झालेल्या प्रवेशितांना दवाखान्यात नेणे-आणणे. |
| २५ | पहारेकरी | ST, W, SE, | OL, BL, HH, | बालगृह व शासकीय संस्थांमध्ये पहारेकरी म्हणून देखरेख करणे. |
| २६ | मदतनीस | S, ST, PP, L, B, SE, H | OL, HH, LV | शासकीय संस्थांची व संस्थेमध्ये दाखल झालेल्या प्रवेशितांना दवाखान्यात नेणे-आणणे तसेच संस्थेमधील इतर काम |